**फौ.कि.अ.क्र.७९/२०२३**

**ज्योती आहेर –वि– शुभम आहेर**

**निशाणी क्र. १९**

**अर्जदार ज्योती शुभम आहेर यांचा उर्वरित उलटतपास गैरअर्जदारातर्फे श्री. डी. आर. गांगुर्डे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

१. माझे सध्याचे नाव ज्योती शुभम आहेर असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सा.वाल्यासोबत फारकत घेतल्यानंतर रायपूर येथील एका व्यक्तीसोबत दुसरे लग्न केलेले आहे. शपथेवर न्यायालयामध्ये खोटी साक्ष देणे हा कायद्याने गुन्हा आहे याची मला माहिती आहे.

२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बाळंतपणाचा संपूर्ण खर्च सा.वाला व त्याच्या कुटूंबियांनीच केले आहे. हे म्हणणे खरे नाही की,अर्जदार क्र. २ च्या जन्मानंतर देखील सा.वाला मला व्यवस्थित नांदवत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सा.वाल्याला न सांगता परस्पर माहेरी निघून जात होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माहेरी निघून गेल्यानंतर सा.वाला मला नेण्यासाठी माझ्या माहेरी यायचा. हे म्हणणे खरे नाही की, सा.वाल्याची मला नांदवण्याची प्रामाणिक इच्छा असल्यामुळे मी त्याच्यासोबत नांदायला जात होते.

३. हे म्हणणे खरे नाही की, सा.वाला जेव्हा मला नांदायला नेण्यासाठी माझ्या माहेरी येत होता तेव्हा माझे आईवडील व भाऊ त्याला शिवीगाळ करत होते. हे म्हणणे खरे नाही की, मला सा.वाल्यासोबत माझ्या सासु–सासऱ्यांपासून विभक्त राहायचे होते त्यामुळे मी नेहमी नांदायला येण्यास टाळाटाळ करत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी जेव्हापासून माझ्या माहेरी

राहते. तेव्हापासून माझा व अर्जदार क्र. २ चा संपूर्ण दैनंदिन खर्च सा.वाला करतो. हे म्हणणे खरे नाही की, विभक्त राहण्याच्या कारणावरुन सन २०२२ मध्ये माझ्या मध्ये व माझ्या सासु–सासऱ्यांमध्ये वाद झाला होता.

४. हे म्हणणे खरे नाही की, ऑक्टोबर २०२२ मध्ये मी माझ्या माहेरी निघून गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी माझ्यासोबत सा.वालयाचे शैक्षणिक कागदपत्र व पाच तोळे सोने घेऊन गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, पूंजाराम आहेर हे माझे आजे–सासरे आहेत. युवराज कुरणे माझे नंदोई आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सुर्यकांत वाघचौरे हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पूंजाराम आहेर, युवराज कुरणे, सुर्यकांत वाघचौरे मला नेण्यासाठी माझ्या माहेरी वाळकेवाडीला आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना मी नांदायला येण्यास स्पष्ट नकार दिला.

५. हे म्हणणे खरे नाही की, सा.वाल्याची मला नांदवायची आधीपासूनच व आताही प्रामाणिक इच्छा आहे. मी आज न्यायालयातून सा.वाल्यासोबत नांदायला जायला तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे फोन आहे. माझ्या भावाकडे फोन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नांदायला यावे यासाठी सा.वाला माझ्या व भावाच्या मोबाईलवर फोन करत होता. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र. २ चा जन्म झाल्यानंतर देखील मला नांदायला नेण्यासाठी सा.वाला नेहमी माझ्या माहेरी येत होता.

६. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा भाऊ नांदायला नेण्यासाठी कोणी आल्यास तुमच्याविरुद्ध न्यायालयामध्ये केस करु अशी धमकी देत होतो. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार क्र. २ चा जन्म झाल्यानंतर मला सा.वाल्यासोबत संसार करायचा नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मला

सा.वाल्यासोबत नांदायचे नव्हते त्यामुळे मी निफाड न्यायालयामध्ये विवाह विच्छेदन अर्ज क्र. ५०/२०२३ दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाने तो अर्ज दि.२९.०९.२०२३ रोजी मंजूर करुन आमची फारकत देखील मंजूर केली होती. हे म्हणणे खरे नाही की, ती फारकत झाल्यानंतर देखील सा.वाल्याने मी त्याच्याकडे नांदायला जावे यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले होते. हे म्हणणे खरे नाही की, फारकतीच्या रुपाने मी सा.वाल्याचा स्वतःहून त्याग केलेला आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, फारकत झाल्यानंतर देखील सा.वाला अर्जदार क्र. २ ला भेटण्यासाठी नेहमी वाळकेवाडीला येत होता. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र. २ ला सा.वाला भेटू नये अशी माझी इच्छा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुलीला भेटण्याच्या कारणावरुन मी व माझ्या भावाने सा.वाल्याला मारहाण देखील केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सा.वाला अर्जदार क्र. २ ला सांभाळायला तयार आहे. अर्जदार क्र. २ चा ताबा मी सा.वाल्याला द्यायला तयार नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, सा.वाला नोकरीला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याच्या नावाने स्वतंत्र शेतीचा ७/१२ उतारा, घर नाही. माझे शिक्षण एस.वाय. बी.ए पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला अर्जदार क्र. २ सह सा.वाल्याकडे नांदायचे नसल्यामुळे मी स्वतःहून त्याचा त्याग केलेला आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, सा.वाला आम्ही लग्नामध्ये त्यांना योग्य हुंडा दिला नाही म्हणून माझा शारीरिक व मानसिक छळ करायचे याबाबत मी पो.स्टेशनला तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पो.स्टेशनला

तक्रार दिली हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. तसा कागदोपत्री पुरावा मी न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे.

१०. सा.वाल्यांनी माझ्याकडे आयशर गाडीचे कर्ज फेडण्यासाठी माहेरहून पैसे आणण्याची मागणी केली होती. त्याबाबत मी पो.स्टेशनला तक्रार दिली होती. त्याची कागदपत्रे मी दाखल करण्यास तयार आहे. सा.वाल्यांनी माझ्याकडे ५० ते ६० हजार रुपये मागितले होते. मी सा.वाल्याविरुद्ध चांदवड पो.स्टेशनला तक्रार केली होती. मी सा.वाल्याविरुद्ध पो.स्टेशनला जी तक्रार केली होती त्याचे कागदपत्र पुढील तारखेस दाखल करण्यास तयार आहे.

११. सा.वाला मला नेहमी उपाशी ठेवायचा याबाबत मी कोणत्याही पो.स्टेशनला तक्रार केलेली नाही. दत्तू दगडू शिंदे हा सा.वाल्याचा नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सा.वाल्याकडे नांदावे यासाठी मी व माझ्या कुटूंबियांनी व्यक्तीशः कोणतेही प्रयत्न केले नाहीत. माझा भाऊ सोमनाथ वाळके, बाबाजी घोरपडे, भाऊसाहेब सोनवणे यांच्या मध्यस्थीने मी सा.वाल्यांकडे नांदणेकामी प्रयत्न केले होते त्याची निश्चित तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे लग्न कोरोना काळात झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे लग्नाला केवळ ५० ते ६० लोक हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्नामध्ये आम्ही सा.वाल्याला दोन तोळ्याची सोन्याची आंगठी घेतली हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सा.वाल्याने मला घरातून लहान मुलीसह दि.२५.१०.२०२२ रोजी हाकलून दिले. याबाबत मी पो.स्टेशनला कोणतीही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की,

सा.वाल्यांनी माझ्याकडे वेळोवेळी पैशाचा तगादा लावून माझा शारीरिक व मानसिक छळ केला हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सा.वाला पूर्णतः कर्जबाजारी झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याने कर्जावर गाडी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सा.वाल्याने ते कर्ज न फेडल्यामुळे त्याची गाडी देखील जप्त केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सा.वाला माझ्यासोबत फारकत झाल्यामुळे आजही कोणताही कामधंदा करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या फारकतीमुळे तो पूर्णतः वैफल्यग्रस्त झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सा.वाल्याची मला दरमहा र.रु. ५,०००/– अन्न वस्त्राची रक्कम देण्याची ऐपत नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की, मला नांदायला नेण्यासाठी मी वकीलांमार्फत सा.वाल्याला नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वरिष्ठ न्यायालयात सा.वाल्याने मला नांदायला न्यावे यासाठी दावा दाखल केला नाही.

**सा.वाल्यांच्या विधिज्ञांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.10 17:53:34 +0530

**दि. १०.०३.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क.स्तर,**
**चांदवड.**